**वादी तर्फे अतिरिक्त सरतपास – श्री. जी. जे. पाटील वकील.**

**७.** आता मला संजय रामू हडलगेकर याने करुन दिलेले प्रतिज्ञापत्र दाखवले, सदर प्रतिज्ञापत्र प्रतिवादीने मान्य केल्यामुळे त्याला **नि. क्र.७१** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी तर्फे उलट तपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

८. मी माझ्या व वादी क्र.२ ते ४ यांच्या वतीने प्रतिवादी विरुध्द पोटगी मिळण्यासाठी न्यायालयात कि.फौ.अ.क्र.४/२०१७ दाखल केला होता. आज रोजी वादी क्र.२ चे वय १५ वर्षे, वादी क्र.३ व ४ या जुळया असून त्यांचे वय १२ वर्षे आहे. मी प्रतिवादी विरुध्द भा.द.वि.कलम ४९८-अ प्रमाणे तक्रार दाखल केली होती. मी दाखल केलेला पोटगीचा अर्ज अंशतः मंजूर झालेला असून प्रतिवादीची भा.द.वि.कलम ४९८-अ च्या गुन्हयातून सुटका झालेली आहे.

९. मला पोटगीच्या अर्जामध्ये न्यायालयाने आर्थिक मदत मंजूर केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला न्यायालयाने प्रतिवादीची कायदेशीर पत्नी नसल्याच्या कारणामुळे पोटगी नाकारलेली आहे. मी पोटगीच्या न्यायनिर्णया विरोधात वरिष्ठ न्यायालयात दाद मागितलेली नाही. मी वादी क्र.२ ते ४ यांना मंजूर झालेली पोटगीची रक्कम वसूल करण्यासाठी आजरा न्यायालयात कि.फौ.अ.क्र.४९/२०२२ आणि २९/२०२४ दाखल केलेले आहेत. मला प्रतिवादी कडून आजपर्यंत पोटगीसाठी पावणेपाच लाख रुपये मिळाले आहेत किंवा नाहीत याबाबत सांगता येणार नाही.

**१०**. मी पोटगीच्या अर्जामध्ये प्रतिवादीच्या मालकीची उत्तूर येथील गट क्र.१०७३/१ मधील ०.४० आर जमीन असल्याचे नमूद केले होते. ती जमीन पुर्वी माझे वडिल एकनाथ कृष्णा घोरपडे यांच्या नावावरती होती.

**प्रश्न** – ती मिळकत प्रतिवादीच्या नावावरती कशी आली आहे ?

**उत्तर** – प्रतिवादीने माझ्या वडिलांकडे मला नांदवण्या करीता पैसे अथवा जमिनीची मागणी केल्यामुळे माझ्या वडिलांनी त्याच्या नावावरती करुन दिली आहे.

**११**. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत दि.१०.१०.२००६ रोजी अनु.क्र.

११८२/२००६ चे नोंदणीकृत खरेदीपत्र झालेले आहे. आम्ही या दाव्यामध्ये सदर जमिनीत हिस्सा मागितलेला आहे. २००६ सालापासून प्रतिवादीचे नावे सदर मिळकतीच्या ७/१२ उता–याला लागलेले आहे. माझे वडिल सन २०१५ साली वारले आहेत. माझ्या वडिलांनी त्यांच्या हयातीमध्ये प्रतिवादीच्या नावे केलेले विक्रीपत्र रद्द करुन मागितलेले नाही. ते खरेदीपत्र रद्द करण्याबाबत वडिलांचे वारस म्हणून मी अथवा माझ्या आई, भाऊ व बहिणीने कोठेही दाद मागितलेली नाही.

**१२**. उत्तूर येथील गट क्र.१०७३/१ मधील प्रतिवादीच्या नावे असलेली ०.४० आर जमीन आमच्या ताब्यात आहे. माझ्या वडिलांना एक भाऊ व चार बहिणी आहेत. सदर मिळकतीच्या ७/१२ उता–याला माझ्या काका व आत्यांची नावे आहेत. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर माझी आजी शेवंता कृष्णा घोरपडे वारलेली आहे. माझे वडिल हयात असताना वरील गटातील क्षेत्र आजीच्या नावे स्वतंत्र दाखल होते.

**१३**. गट क्र.१०७३ चे एकूण क्षेत्र साडेदहा एकर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल हयात असताना त्यांचे भाऊ दशरथ यांच्या नावे अडीच एकर जमीन स्वतंत्र नोंदविण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलां व्यतिरिक्त त्यांच्या बहिणींची नावे वरील जमिनीच्या मालकी सदरात नोंदलेली नाहीत. माझ्या आत्यांची नावे सुनंदा विष्णू गोरे, नंदा राजाराम पोवार, शालन नारायण पोवार व अंजना रंगराव जाधव अशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वरील गटात आत्या सुनंदा व्यतिरिक्त इतरांची नावे नाहीत.

**१४**. हे म्हणणे खरे नाही की, सदर गटात आत्या सुनंदाच्या नावे विक्रीपत्राने ०.४० आर क्षेत्राबाबत नाव लागले आहे. वरील गटात तानाजी कृष्णा पाटील यांची ०.४१ आर जमीन ७/१२ उतारा सदरी आहे. तानाजी पाटील यांचे त्या क्षेत्रामध्ये घर व रेणूका मंदिर आहे. आजी शेवंताने सदर क्षेत्राची तानाजी पाटील यांना विक्री केली होती. मला सदर विक्रीला किती वर्षे झाली याबाबत सांगता येणार नाही.

**१५**. सुरेखा धर्मराज येजरे हिला माझ्या आत्या व काकांनी वरील गटातील एक एकर जमीन विक्री केलेली असून सदर मिळकत तिच्या ताब्यात आहे. मला सदर

गटात सिमा संदिप आढावकर हिच्या नावे दोन गुंठे, किरण दशरथ घोरपडे याच्या नावे एक हेक्टर आणि रेखा शिवाजी मनगुतकरच्या नावे अडीच गुंठे जमीन कशी आली याबाबत माहिती नाही.

**१६**. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर माझी व माझ्या आई आणि इतर भावंडांची सदर गटातील १ हेक्टर ११ आर क्षेत्राकरीता नावे लागली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी आमचे कोणाचेही सदर गटातील मिळकतींच्या उता-यावरती नावे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर गटातील मिळकतीवरील आमचा हक्क फेरफार क्र.५२९३ च्या हस्तांतर नोंदीमुळे रद्द करण्यात आलेला आहे.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल व चुलते एकत्र राहत होते. मी माझ्या वडिलांनी प्रतिवादीला करुन दिलेले विक्रीपत्र पाहिलेले नाही. माझे सातवी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. आम्ही दावा दाखल करताना आमच्या नातेवाईकांची सदर गटातील मिळकतीला नावे होती. मला आमच्या ताब्यात असलेल्या ०.४० आर क्षेत्राच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाहीत. माझ्या जन्माच्या पुर्वीपासून सदर मिळकतीत ऊसाचे पिक घेतले जाते.

**१८**. मी दाखल केलेल्या पोटगीच्या अर्जामध्ये वरील मिळकत माझ्या ताब्यात असल्याची बाब नमूद केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यातील मिळकतीच्या उत्तरेला प्रकाश भादवणकर यांचे घर, दक्षिणेला दशरथ कृष्णा घोरपडे यांची जमीन, पुर्वेला महादेव गावडे यांची जमीन आणि पश्चिमेला माझ्या वडिलांची याच गटातील उर्वरीत जमीन आहे. गट क्र.१०७३/१ मधील मिळकत ही प्रतिवादीच्या मालकीची नाही.

**१९**. मी माझ्या पहिल्या विवाहाचे विच्छेदन केल्याबाबतचा लेखी कागद संजय रामू हडलगेकर याच्या निट्टूर, ता. चंदगड या गावी दि.०२.०७.२००३ रोजी केला होता. आम्ही त्याबाबतचा नोंदणीकृत दस्त केला नव्हता. आम्ही न्यायालया मार्फत घटस्फोट घेतलेला नाही. माझे दि.०४.१०.२००१ रोजी संजय सोबत निट्टूर गावी लग्न झाले होते. माझे लग्न माणसे जमवून झाले होते, त्याबाबत लग्नाची यादी तयार

करण्यात आली नव्हती.

**प्रश्न** – तुम्ही नि.क्र.७१ वरील संजय हडलगेकरच्या शपथपत्रा व्यतिरिक्त तुमचा घटस्फोट झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा सादर केला आहे काय ?

**उत्तर** – माझ्याकडून तो कागद हरवलेला असल्यामुळे मी तो सादर केलेला नाही.

**२०**. मी संजय हडलगेकर सोबत लग्न केल्यानंतर घटस्फोट होईपर्यंत उत्तूर येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी विरुध्द या दाव्यापूर्वी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये माझे संजय हडलगेकर सोबत लग्न झाल्याची बाब सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या प्रकरणांतील पुराव्या दरम्यान संजय हडलगेकरची पत्नी असल्याची बाब नाकारली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अतिरिक्त पुराव्याच्या शपथपत्रामधून संजय हडलगेकर सोबत माझे लग्न झाल्याची बाब प्रथमतः न्यायालया समक्ष आणली आहे.

**२१**. प्रतिवादी पुर्वीपासून मी संजय हडलगेकरची पत्नी असल्याचा बचाव घेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा व संजय हडलगेकरचा कायदेशीर घटस्फोट झालेला नसल्यामुळे त्याची पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा व प्रतिवादीचा कधीही कायदेशीर विवाह झालेला नाही. मी कोणत्याही शासकीय कार्यालयास संजय हडलगेकर सोबत घटस्फोट झाल्याची बाब कळवलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१०.०७.२००५ रोजी प्रतिवादी सोबत विवाह झाल्याची आर्दाळ येथे चुकीची नोंद घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी सोबतच्या कायदेशीर विवाहातून वादी क्र.२ ते ४ झाल्याचे खोटे सांगत आहे.

**२२**. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी सोबत विवाह केल्यानंतर राहत असताना त्याने त्रास दिल्याचे काल्पनिक कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या व प्रतिवादी दरम्यान कायदेशीर प्रकरणे चालू झाल्यानंतर मी व माझ्या नातेवाईकांनी त्याला उत्तूर येथील गट क्र.१०७३ मधील जमिनीत येण्यास अडथळा करण्यास सुरुवात केली आहे. प्रतिवादीने त्याबाबत आमच्या विरोधात नि.दि.दा.क्र.९२/

२०१७ दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी कडून सदर मिळकत काढून घेण्यासाठी प्रस्तूतचा खोटा दावा दाखल केला आहे.

**२३**. मी दाव्यातील आर्दाळ येथील जमिनीचे ७/१२ उतारे पाहिलेले आहेत. मी त्याबाबतच्या मला पुर्वी माहित असलेल्या चर्तुःसिमा सांगू शकते. मला सदर मिळकतींच्या दाव्यात व माझ्या शपथपत्रात चर्तुःसिमा का नमूद केल्या नाहीत याचे कारण सांगता येणार नाही. मी दावा दाखल करताना माझ्या वकिलांना चर्तुःसिमा सांगितल्या होत्या. मी त्याबाबत वकिलांना लेखी माहिती दिली होती.

**२४**. प्रतिवादीच्या गट क्र.३७३ मधील जमिनीच्या पुर्वेस शेळके यांची जमीन, पश्चिमेस तुकाराम शिवणे यांची जमीन, उत्तरेस नारायण शिवणे यांची जमीन आणि दक्षिणेस संतू रामा शिवणे यांची जमीन आहे. गट क्र.३९३ चे १५ गुंठे क्षेत्र असून त्याच्या पुर्वेस ईश्वर शिवणे, पश्चिमेस तुकाराम शिवणे, उत्तरेस पुंडपळ आणि दक्षिणेस वायरमन तुकाराम शिवणे यांची जमीन आहे. गट क्र.३९६ चे १९.५ गुंठे क्षेत्र असून त्याच्या पुर्वेस संतू रामा शिवणे, पश्चिमेस भैरु शिवणे, उत्तरेस तुकाराम शिवणे आणि दक्षिणेस बाळू शिवणे यांची जमीन आहे.

**२५**. गट क्र.४०५ चे २ गुंठे क्षेत्र असून त्याच्या पुर्वेस तुकाराम शिवणे, पश्चिमेस संतू रामा शिवणे, उत्तरेस बाळकृष्ण शिवणे आणि दक्षिणेस ईश्वर शिवणे यांची जमीन आहे. गट क्र.६१० चे ४.५ गुंठे क्षेत्र असून त्याच्या पुर्व आणि पश्चिम दिशेस कोणाच्या जमिनी आहेत याबाबत आठवत नसून उत्तरेस संतू रामा शिवणे आणि दक्षिणेस भैरु रामा शिवणे यांची जमीन आहे. गट क्र.६२५ चे ३.५ गुंठे क्षेत्र असून त्याच्या पुर्वेस संतू रामा शिवणे, पश्चिमेस भैरु रामा शिवणे, उत्तरेस तुकाराम शिवणे आणि दक्षिणेस बाळकृष्ण शिवणे यांची जमीन आहे.

**२६**. प्रतिवादीच्या वडिलांना त्याच्यासह तुकाराम, संतू, ईश्वर, भैरु आणि मयत जानबा अशी सहा मुले आहेत. मयत जानबाला बाळकृष्ण व अनुसया असे दोन वारस आहेत. प्रतिवादीला चार बहिणी आहेत. प्रतिवादीचे वडिल ४० वर्षांपुर्वी वारलेले आहेत. मी दाव्यात नमूद केलेल्या आर्दाळ येथील जमिनी प्रतिवादीच्या वडिलांच्या

वडिलोपार्जित मिळकती आहेत. सदर मिळकतींची प्रतिवादी व त्याच्या बहिण-भावांमध्ये माझ्या लग्नापूर्वी वाटण्या झालेल्या आहेत. मी त्याबाबतचा लेखी पुरावा पाहिलेला नाही.

**२७**. आम्ही वाटून मागितलेले क्षेत्र इतरांपेक्षा वेगळे असल्यामुळे प्रतिवादीच्या बहिण-भावांना या दाव्यात समाविष्ट केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नोकरीला नाही. प्रतिवादी सन २००६ साली दुबई येथे नोकरी करत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याने दुबईच्या नोकरीच्या उत्पन्नातून माझ्या वडिलांकडून उत्तूर येथील मिळकतीची खरेदी केलेली आहे. आज रोजी आर्दाळ येथे प्रतिवादीच्या नावे १ एकर ५ गुंठे जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्दाळ येथील दाव्यात नमूद केलेल्या गटातील जमिनीची इतर लोकांना विक्री झालेली आहे.

**२८**. हे म्हणणे खरे नाही की, आर्दाळ येथे प्रतिवादीच्या ताब्यात कोणतीही जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नवी मुंबई येथे हातगाडीवरती वेटरचे काम करतो. माझ्या व प्रतिवादीच्या लग्नाला संजय हडलगेकर व त्याच्या कुटुंबातील लोक आलेले नव्हते. आमच्या लग्नात मध्यस्थी करणा-यांनी प्रतिज्ञापत्र देण्याकरीता दि.०७.०६.२०२३ रोजी संजय हडलगेकरला गडहिंग्लज येथे आणले होते. मी संजय हडलगेकरला बोलावून आणणा-या मध्यस्थाची साक्ष नोंदविणार आहे.

**२९**. **प्रश्न** - तुम्ही नि.क्र.६८ वरील तुमच्या अतिरिक्त सरतपासाच्या परिच्छेद क्र.५ मधील तुमच्या पहिले लग्न आणि घटस्फोटा बाबतचा मजकूर दावा दाखल करताना तुमच्या वकिलांना सांगितला होता काय ?

**उत्तर** - मी सदर बाब माझ्या पुर्वीच्या वकिलांना सांगितली होती. त्यांनी सदर बाब दाव्यात का नमूद केलेली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**३०**. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत माझा अथवा माझ्या मुलींचा हक्क नसताना केवळ त्याला त्रास देण्यासाठी आम्ही खोटा दावा दाखल केला आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०५.१२.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.